२७१

श्री. वि. स. म्हसवडे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम, १९६६

# आणि

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (निधींचें पुनर्विनियोजन) नियम, १९७१

(३१ डिसेंबर १९८८ पर्यंन्त सुधारित)

(किमत रु. [redacted] ९.००)

शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०६६/डी/तीन, दिनांक ३१ जानेवारी, १९६६ यात :—

(१) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०६६/४९१७२/डी/तीन, दिनांक २३ डिसेंबर, १९६६.

(२) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०६६/१०३५८/६९/डी/तीन, दिनांक २२ मे, १९६९.

(३) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०७१/२२२१६/डी/तीन, दिनांक २३ मार्च, १९७३.

(४) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०७३/६२३३/झेड/चार, दिनांक १६ एप्रिल, १९७४.

(५) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०७२/३२७४१/चौतीस, दिनांक २२ नाव्हेंबर, १९७५.

(६) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग, क्रमांक झेडपीए-१०७५/२६४१/चौतीस, दिनांक १५ जुलै, १९७६.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम, १९६६ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, ह्या नियमात :—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६६;

(ब) "कलम" म्हणजे त्या अधिनियमाचे कलम.

३. **अर्थसंकल्पाचा नमुना.**—ह्या नियमांच्या तरतुदीस अधीन राहून, प्रत्येक जिल्हा परिषदेचे आणि पंचायत समितीचे, प्रत्येक वित्तीय वर्षातील, प्राप्तीचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे, या नियमांच्या अनुसूचीमध्ये घालून दिलेल्या नमुन्यातच तयार करण्यात येतील.

४. **प्रधान शीर्षाचे वर्गीकरण.**—नमुन्यात दर्शविलेल्या गटांखाली प्रधान शीर्षाचे वर्गीकरण करण्यात येईल. अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये नमूद करण्यात आलेली प्रधान व गौणशीर्षे यांमध्ये राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय फेरबदल करण्यात येणार नाही.

५. **विकासविषयक खर्च.**—पंचायत समितीने सामूहिक विकास कार्यक्रमावर केलेला खर्च, (जरी तो "तृतीय पंचवार्षिक योजनांतर्गत योजना" या स्वतंत्र गौणशीर्षाखाली खर्च खाती घालता येण्याजोगा म्हणून अर्थसंकल्पीय अंदाजांच्या स्वरुपात दाखविण्यात आलेला असला तरीही) प्रथमतः संबंधित योग्य अशा प्रधान शीर्षाखाली खर्च खाती घालण्यात येईल. त्यानंतर, दर तीन महिन्यांनी, असा खर्च स्वतंत्र वजेच्या नोंदीद्वारे समायोजन करून "१७—सामूहिक विकास" या प्रधान शीर्षाखाली हस्तांतरित करण्यात येईल.

६. **विवक्षित खर्च स्वतंत्रपणे दाखविणे.**—कलम १८२ अन्वये जी बांधकामे व ज्या विकास-विषयक योजनाकरिता, जिल्हा परिषदेला प्रयोजनार्थ अनुदान देय असेल ती बांधकामे व विकास-विषयक योजनांवरील आणि कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदेस ज्याकरिता आस्थापना अनुदान देय असेल अशा जिल्हा परिषदांकडे बदली करण्यात आलेल्या पदांच्या संबंधातील वेतन व भत्ते यावरील खर्च, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या इतर खर्चापासून वेगळा दाखविण्यात येईल.

**७. उप-शीर्ष.**—जिल्हा परिषदेस किंवा यथास्थिती, पंचायत समितीस निरनिराळ्या कामांवरील खर्च दर्शविण्यासाठी म्हणून संबंधित प्रधान शीर्षाच्या गौण शीर्षाखाली योग्य अशी उप-शीर्षे काढता येतील. अशा खर्चाचा तपशील प्राथमिक घटकांद्वारे दाखविण्यात येईल :—

(१) आस्थापनेचे वेतन.
(२) भत्ते आणि मानधन.
(३) आकस्मिक खर्च.
(४) सहायक अनुदान.
(५) शिष्यवृत्त्या.

**८. कलम १३७ (१) आणि (२) याच्या प्रयोजनार्थ तारीख.**—प्रत्येक पंचायत समितीचे अर्थसंकल्पीय अंदाज [१](१५ फेब्रुवारीनंतर) नसेल अशा तारखेला तयार करण्यात येतील आणि प्रत्येक जिल्हा परिषदेचे अर्थसंकल्पीय अंदाज [२](२७ फेब्रुवारीनंतर) नसेल अशा तारखेला [३] [३]( * * * ) तयार करण्यात येतील.

**९. कलम १३७ (३) व (४) च्या प्रयोजनार्थ तारीख.**—प्रत्येक पंचायत समितीने मान्य केलेले अर्थसंकल्पीय अंदाज [४] (२५ फेब्रुवारीनंतर) नसेल अशा तारखेला जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येतील आणि जिल्हा परिषद, कलम १३७, पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेले आपले अर्थसंकल्पीय अंदाज, प्रत्येक वर्षी [५](२७ मार्चनंतर) नसेल अशा तारखेला मान्य करील.

**१०. अखेरची शिल्लक.**—जिल्हा परिषदेने मान्य करावयाचे सर्व अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि / किंवा निधींचे पुनर्विनियोजन यांमध्ये, अधिनियमाच्या कलम १३९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे मुक्त महसुली शिलकेची तरतूद करण्यात आलेली आहे याची प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी खातरजमा करून घेईल.

**११. वगळावयाच्या बाबी.**—नियम १ मध्ये निर्दिष्ट केलेली मुक्त महसुली शिल्लक म्हणजे, सर्व भारांपासून मुक्त असलेली महसुली शिल्लक आणि पुढील कारणांमुळे राहिलेली शिल्लक वगळता ही शिल्लक काढण्यात येईल :—[६]

(अ) शासकीय अनुदाने व कर्जे (जिल्हा निधीत जमा करण्यात आलेल्या वसुलीच्या रकमेसह) यांची खर्च न केलेली शिल्लक;
(ब) अर्थोपाय आगाऊ रकमांची परतावा न केलेली शिल्लक;
(क) अभिकरण योजनांची खर्च न झालेली शिल्लक (ग्राम पंचायतींना तसेच पंचायत समित्यांना देय असलेल्या उपकर व अनुदाने यांच्या प्रदानासह);
(ड) ठेवी;
(ई) कर्जे व आगाऊ रकमा (शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा या व्यतिरिक्त);
(फ) विशेष निधी—उदा. (एक) भविष्यनिर्वाह निधी, (दोन) निवृत्तीवेतन निधी, (तीन) घसारा निधी, (चार) विकास निधी इत्यादी;
(ग) विशिष्ट प्रयोजनांसाठी खाजगी व्यक्तींकडून मिळालेली अंशदाने/अनुदाने यांच्या खर्च न केलेल्या शिल्लक रकमा.

---

१. दि. २३-१२-१९६६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "१ फेब्रुवारीनंतर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. दि. २२-५-१९६६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "१५ फेब्रुवारीनंतर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. दि. २३-१२-१९६६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "किंवा राज्य विधान मंडळाला" या मजकुराने सुरू होणारा व "त्या तारखेनंतरच्या तारखेस" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

४. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "५ मार्चनंतर या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. दि. २३-१२-१९६६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "१५ मार्च नंतर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. दि. १६-४-१९७६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे कलमे १० व ११ जादा दाखल करण्यात आली.

# अनुसूची

## लेखाशीर्ष

### सुरुवातीची शिल्लक

**एक महसूल**

**अ. कर--**

**१. कर आणि फी--**

(एक) व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकरी यावरील कर.

(दोन) सर्वसाधारण पाणीपट्टी.

(तीन) सार्वजनिक करमणूक व मनोरंजन यावरील कर.

(चार) यात्रेकरूंवरील कर.

(पाच) जमिनी व इमारती यांवरील विशेष कर.

(सहा) रस्ते व पूल यावरील पथकर व तो वसूल करण्याचे काम पट्ट्याने देणे.

(सात) संकीर्ण.

(आठ) बाजार फी.

(नऊ) अनुज्ञप्ती (लायसन्स) फी.

(दहा) प्राण्यांकरिता नोंदणी फी.

(अकरा) संकीर्ण प्राप्ती.

वजा : परताव्याच्या रकमा.

**ब. नेमून दिलेला महसूल--**

**२. स्थानिक उपकर--**

(एक) कलम १४४, १५१ किंवा १५२ अन्वये लादलेला उपकर.

(दोन) कलम १५५ अन्वये वाढवलेल्या दराने बसविलेला उपकर. :—

(अ) जिल्हा परिषदेचा उपकरातील हिस्सा.

(ब) जिल्हा परिषदेने पंचायत समितीला अनुदान म्हणून दिलेला उपकराचा भाग.

(तीन) मुद्रांक शुल्क अनुदान.

वजा : परताव्याच्या रकमा.

**३. स्थानिक कर--**

(एक) पाणीपट्टीवरील उपकर :—

(अ) पाटबंधारे.

(ब) ग्राम सेवा निधी.

वजा : परताव्याच्या रकमा.

**क. अनुदाने—**

**४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याअन्वये शासनाकडून अनुदान—**

(एक) जमीन महसूल अनुदान.

(दोन) समानीकरण अनुदान.

(तीन) प्रयोजनार्थ अनुदान.

(चार) आस्थापना अनुदान.

(पाच) तूट समायोजन अनुदान.

(सहा) स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान.

(सात) प्रोत्साहन अनुदान.

(आठ) योजनांतर्गत योजनांसाठी अनुदान.

(नऊ) गट अनुदान.

**(अ) विशष प्रयोजनासाठी अनुदाने—**

(एक) सामुहिक विकास खर्चाकरिता अनुदाने.

(दोन) इतर योजनांतर्गत खर्चाकरिता अनुदाने.

**(ब) सर्वसाधारण प्रयोजनांसाठी अनुदाने—**

(एक) सामुहिक विकास खर्चाकरिता अनुदाने.

(दोन) इतर योजनांतर्गत खर्चाकरिता अनुदाने.

(दहा) वजा—परताव्याच्या रकमा.
लेखापरीक्षेमध्ये दर्शविण्यात आलेल्या वसुलीच्या रकमा.

(अकरा) अभिकरणाच्या(एजन्सी) कामासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रकमा. अभिकरण आधारावर हस्तांतरित केलेल्या योजनांनुसारच्या उपशीर्षांसह विभागानुसार गौण शीर्षे उघडण्यात येतील.

**४-अ. शासनाने दिलेली इतर अनुदाने—**

(एक) तदर्थ अनुदाने.

(दोन) संकीर्ण.

**ड. इतर उत्पन्नाची साधने—**

**५. व्याज—**

**(एक) जिल्हा परिषदेने दिलेल्यो कर्जावरील आणि आगाऊ रकमांवरील व्याज —**

(अ) खाजगी संस्थांना दिलेल्या कर्जावरील व्याज.

(ब) नगरपालिका/ग्रामपंचायती यांना दिलेल्या कर्जावरील व्याज.

(क) कर्मचारी वगैरेंना दिलेल्या कर्जावरील व्याज.

**(दोन) शिलकी रकमा गुंतविल्यामुळे मिळणारे व्याज—**

(अ) सरकारी रोख्यांमध्ये गुंतविलेल्या रकमांवरील व्याज.

(ब) बँकेतील शिल्लक रकमांवरील व्याज.

(क) इतर रोख्यांमध्ये रकमा गुंतविल्यामुळे मिळणारे व्याज.

(तीन) **विशेष निधींवरील व्याज—**

(अ) भविष्य निर्वाह निधीवरील व्याज.

(ब) निवृत्तीवेतन निधीवरील व्याज.

**टिप.**—प्रत्येक निधी स्वतंत्रपणे दर्शविण्यात येईल.

(क) इतर संकीर्ण निधींवरील व्याज.

(एक) देणग्यांवरील व्याज.

(ड) थकलेल्या देण्यांवरील व्याज.

वजा : परताव्याच्या रकमा.

**६. पोलीस—**

(एक) मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० अन्वये जमा झालेल्या रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

**७. शिक्षण—**

(एक) प्राथमिक शाळांपासून मिळणारी फी.

(दोन) माध्यमिक शाळांपासून मिळणारी फी.

(तीन) मूलोद्योग शाळांपासून मिळणारी फी.

(चार) जादा दिलेल्या रकमांची वसुली.

(पाच) देणग्यांपासून मिळणारे उत्पन्न.

(सहा) दंड.

(सात) स्थानिक नसतील अशा प्राधिकृत नगरपालिकांकडून मिळणारे अंशदान.

(आठ) इतर जमा रकमा—

(अ) सार्वजनिक अंशदान.

(ब) जुन्या भांडार वगैरेची विक्री.

(क) संकीर्ण जमा रकमा.

(नऊ) (एक) ते (तीन) च्या संबंधातील वजा परताव्याच्या रकमा.

(दहा) संकीर्ण वसुलीच्या रकमा—

(अ) मागील वर्षासाठीच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या रकमांची आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

**८. वैद्यकीय—**

(एक) रुग्णालय फी.

(दोन) औषधांची विक्री.

(तीन) देणग्यांपासून होणारी प्राप्ती.

(चार) अंशदाने.

(पाच) संकीर्ण जमा रकमा.

(सहा) (एक) ते (पाच) च्या संबंधात वजा करावयाच्या परताव्याच्या रकमा.

(सात) संकीर्ण वसुलीच्या रकमा—

(अ) मागील वर्षासाठीच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

९. **सार्वजनिक आरोग्य—**

(एक) बिनसरकारी उत्पन्नाच्या साधनांपासून अंशदाने.

(दोन) जत्रेच्या संबंधातील जमा रकमा.

(तीन) इतर जमा रकमा.

(चार) संकीर्ण जमा रकमा.

(पाच) (एक) ते (पाच) च्या संबंधात वजा करावयाच्या परताव्याच्या रकमा.

(सहा) संकीर्ण वसुलीच्या रकमा—

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या रकमांची आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली, शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

१०. **कृषी—**

(एक) *(कृषी शाळेपासून मिळणाऱ्या रकमा.)

(दोन) कृषीविषयक जमा रकमा.

(तीन) संकीर्ण जमा रकमा (यामध्ये व्यक्तिगत ठेवींच्या लेखाच्या योजनांबद्दलची कोणतीही अनुदाने असल्यास त्यांचा समावेश होईल.)

(चार) (एक) ते (तीन) च्या संबंधातील वजा परताव्याच्या रकमा.

(पाच) संकीर्ण वसुलीच्या रकमा—

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

---

* दि. २३-३-१९७३ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे "कृषि शाळेची फी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

**११. पशुसंवर्धन—**

(एक) पशुवैद्यकीय दवाखान्यापासून मिळणारी फी.

(दोन) गुरांचा बाजार.

(तीन) इतर जमा रकमा.

(चार) (एक) ते (तीन) च्या संबंधात वजा करावयाच्या परताव्याच्या रकमा

(पाच) संकीर्ण वसुलीच्या रकमा.

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

**१२. उद्योग व कुटिरोद्योग—**

(एक) विक्री भांडारे आणि विक्र्यालये यापासून मिळणारी रक्कम.

(दोन) संकीर्ण जमा रकमा.

(तीन) (एक) ते (दोन) च्या संबंधात वजा करावयाच्या परताव्याच्या रकमा.

(चार) संकीर्ण वसुलीच्या रकमा—

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

**१३. सार्वजनिक बांधकामे—**

(एक) भाडे—

(अ) जमिनी.

(ब) इमारती.

(क) संयंत्रे आणि हत्यारे.

(दोन) जुन्या भांडाराची आणि सामानाची विक्री.

(तीन) फळे आणि झाडे यांच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न.

(चार) तरींपासून होणारी प्राप्ती.

(पाच) धर्मशाळेची फी.

(सहा) संकीर्ण—

(अ) जमिनी आणि इमारती यांची विक्री.

(ब) पथिकाश्रमाची फी.

(क) सार्वजनिक अंशदान.

(ड) रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाची साधने.

(ई) लहान रेल्वे व ट्राममार्ग.

(फ) दूरध्वनीच्या तारा.

(ग) संकीर्ण जमा रकमा.

(सात) (एक) ते (सहा) च्या संबंधात परताव्याच्या रकमा वजा कराव्या.

(आठ) संकीर्ण वसुलीच्या रकमा--

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

**१४. निवृत्तिवेतने--**

(एक) निवृत्तिवेतन निधीकरिता अंशदान--

(अ) निवृत्तिवेतन निधीस अंशदान.

(ब) भविष्यनिर्वाह निधीस अंशदान.

**१५. संकीर्ण--**

(एक) जुन्या भांडारांची आणि सामानाची विक्री.

(दोन) अंशदाने.

(तीन) गट योजनांपासून होणारी प्राप्ती--

(अ) निवासीय इमारतीपासून मिळणारे भाडे.

(ब) इतर जमा रकमा.

(चार) संकीर्ण जमा रकमा.

(पाच) (एक) ते (चार) च्या संबंधात वजा करावयाच्या परताव्याच्या रकमा.

(सहा) संकीर्ण वसुली--

(अ) मागील वर्षाच्या लेखापरीक्षेमध्ये मागितलेल्या रोख वसुलीच्या रकमा; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(ब) खर्च न केलेल्या आणि जादा देण्यात आलेल्या रकमांची वसुली; शासनाला परत करावयाच्या रकमा वजा कराव्या.

(क) इतर जमा रकमा.

वजा : परताव्याच्या रकमा.

भांडवलाकडे हस्तांतरित केलेली रक्कम वजा करणे.

एकूण महसूल.

## दोन. भांडवल

**अ. कर्जे--**

**विभाग एक : व्याजी कर्जे--**

(एक) राज्य शासनाकडून कर्जे--

(अ) सामूहिक विकास कार्यक्रमासंबंधातील कर्जे.

(ब) (एक) इतर कर्जे—

(अ) औद्योगिक प्रयोजनांकरिता कर्जे.

(ब) सहकारी योजनांकरिता शेतकऱ्यांना कर्जे.

(क) मागासवर्गाच्या लोकांच्या कल्याणासाठी कर्जे.

(ड) शैक्षणिक प्रयोजनांसाठी कर्जे.

(ई) ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरिता कर्जे.

(फ) लघु उद्योग आणि कुटिरोद्योग यांकरिता कर्जे.

(ग) आग, पूर, वादळ वगैरेमुळे पीडित व्यक्तींच्या सहाय्यार्थ कर्जे.

(दोन) जिल्हा परिषदेने दिलेल्या कर्जाची वसुली.

(तीन) *(पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) सहकारी प्रयत्नांच्या वाढीस चालना देण्यासाठी कर्जे.

(ब) औद्योगिक सहकाराकरिता कर्जे.

(क) लघु उद्योग, कुटीर आणि ग्रामोद्योगांकरिता कर्जे.

(ड) शैक्षणिक योजनांकरिता कर्जे.

(ई) गृहनिर्माण योजनांखालील सहकारी संस्थांना कर्जे.

(फ) गृहनिर्माण योजनांखाली, कोणत्याही मागासवर्गाच्या व्यक्तींना कर्जे.

(ग) मागासवर्गाच्या व्यक्तींना त्यांची परिस्थिती सुधारण्याकरिता कर्जे.

(ह) ग्रामीण गृहनिर्माण प्रकल्प योजनांखाली कर्जे.

(य) वनरोपणासाठी ग्रामपंचायतींना कर्जे.

(चार) इतर कर्जे—

(अ) बँकांकडून अग्रिम धन.

(पाच) जिल्हा परिषदांकडून कर्जे—

(अ) जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना कर्जे.

(ब) व्यक्तींना कर्जे.

वजा : परताव्याच्या रकमा.

**विभाग दोन : बिनव्याजी कर्जे—**

(एक) शासनाने मंजूर केलेल्या हंगामी आगाऊ रकमा.
समायोजन करता येण्यासारख्या म्हणून मंजूर केलेल्या अनुदानांमध्ये समायोजित केलेल्या आगाऊ रकमा वजा करणे.

(दोन) त्याच वर्षामध्ये शासनाला परत करण्यात आलेल्या आगाऊ रकमा.

**ब. ठेवी—**

**विभाग तीन—**

(एक) कर्जनिवारण निधींच्या ठेवी.

---

* दिनांक १५–७–१९७६ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यांत आला.

(दोन) निवृत्तिवेतन निधी—

(अ) शिक्षकांचा निवृत्तिवेतन निधी.
(ब) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा निवृत्तिवेतन निधी.

(तीन) भविष्यनिर्वाह निधी—

(अ) शिक्षकांचा भविष्यनिर्वाह निधी.
(ब) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी.

(चार) घसारा निधी.

(पाच) सार्वजनिक बांधकामविषयक ठेवी—

(अ) कंत्राटदारांकडून अनामत रक्कम.
(ब) स्थानिक संस्थाकडून अनामत रक्कम.

(सहा) प्रतिभूति ठेवी—

(अ) रोखपालांकडून प्रतिभूति.
(ब) कंत्राटदारांकडून प्रतिभूति ठेवी.

(सात) दावा न सांगितलेल्या ठेवी.

(आठ) परतफेड योग्य अग्रिम—

(अ) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना अग्रिम.
(ब) शिक्षकांना अग्रिम.
(क) राज्य शासनाकडून तात्पुरते अग्रिम.

(नऊ) स्थायी अग्रिम.

(दहा) गुंतवणुका—

(अ) वर्षामध्ये केलेल्या गुंतवणुका.
(ब) वर्षामध्ये मुदत पूर्ण झालेल्या गुंतवणुका.

(अकरा) संकीर्ण ठेवी—

(अ) ग्रामपंचायतीकरिता वसूल केलेल्या जमीन महसूल उपकराच्या वसुलीच्या रकमा.
(ब) इतर ठेवी.

**क. लाकारी व्यवसाय**

**ड. संकीर्ण**

एकूण भांडवल.

**वित्तप्रेषण विभाग—**

(एक) जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्यामधील वित्तप्रेषण लेखा (केवळ जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने चालू ठेवावयाचा).

(दोन) पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्यामधील वित्तप्रेषण लेखा (पंचायत समित्यांनी चालू ठेवावयाचा).

एकूण बेरीज.

## खर्च

**१. महसूल—**

**अ. प्रशासन—**

१. अध्यक्ष, **सभापती, *(उप)-सभापती, सभासद** आणि **सदस्य**—

(एक) अध्यक्षांना मानधन.

(दोन) सभापती व *(उप)-सभापती यांना मानधन.

(तीन) अध्यक्ष, सभापती आणि *(उप)-सभापती यांना प्रवास भत्ता.

(चार) घरभाडे आणि इतर भत्ते.

(पाच) सभासदांना प्रवास भत्ता.

२. **सामान्य प्रशासन—**

(एक) सामान्य विभाग—

यामध्ये पुढील विभागांचा समावेश होतो—

(अ) सामान्य आणि आस्थापना.

(ब) महसूल.

(क) नियोजन.

(ड) समाज कल्याण.

(दोन) वित्त विभाग.

(तीन) बांधकाम विभाग.

(चार) कृषि विभाग.

(अ) कृषी.

(ब) पशुसंवर्धन.

(पाच) सहकार व उद्योग विभाग.

(सहा) आरोग्य विभाग.

(सात) शिक्षण विभाग.

(आठ) प्रसिद्धी—

(अ) फिरत्या प्रसिद्धी यानामधून चित्रपट प्रसिद्धीची योजना.

(ब) प्रदर्शन पथकांची स्थापना.

(क) मनोरंजनात्मक कार्यक्रमाद्वारे प्रसिद्धी.

(ड) रेडिओच्या साधनाद्वारे ग्रामीण ध्वनीक्षेपणाच्या योजना.

(नऊ) सामूहिक विकास—

(अ) सामूहिक विकास कार्यक्रम—

†[(एक) राष्ट्रीय विस्तार सेवा प्रकल्पावर ठेवून घेतलेला कर्मचारी वर्ग.]

---

* दिनांक १५-७-१९७६ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† दिनांक १६-४-१९७६ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) स्थानिक विकास बांधकामे—

(एक) पाणी पुरवठा सहायक अनुदान बांधकामे.

**ब. शिक्षण—**

**३. शिक्षण—**

(एक) प्राथमिक आणि मूलोद्योग शिक्षण—

(अ) मुलांकरिता प्राथमिक शाळा.

(ब) मुलींकरिता प्राथमिक शाळा.

(क) मूलोद्योग शाळा—

(एक) प्राथमिक शाळांचे मूलोद्योग शाळांमध्ये रूपांतर.

(ड) पाठ्यवेतन.

(दोन) माध्यमिक शिक्षण—

(अ) मुलांकरिता माध्यमिक शाळा.

(ब) मुलींकरिता माध्यमिक शाळा.

(तीन) तपासणी—

(अ) प्राथमिक शाळांची तपासणी.

(ब) माध्यमिक शाळांची तपासणी.

(क) खाजगी, प्राथमिक व माध्यमिक शाळांची तपासणी.

(चार) शिष्यवृत्त्या—

(अ) प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या.

(ब) माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या.

(क) मागासवर्गांना शिष्यवृत्त्या (अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, इत्यादी).

(ड) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती.

(इ) विदर्भामधील शैक्षणिक सवलती—

(एक) कमी वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलांमुलींना शाळेच्या फीमध्ये सूट दिल्यामुळे प्राप्तीत झालेल्या तुटीबद्दल अनुदाने.

(दोन) ज्यांच्याकडे २० एकरांपेक्षा कमी जमीन असेल अशा शेतकऱ्यांच्या मुलांना सवलती.

(तीन) ६ ते १४ वयोगटातील मुलांना सवलती.

(चार) राजकीय पीडितांच्या मुलांना व मुलींना मोफत शिक्षण.

(फ) इतर शैक्षणिक सवलती—

(एक) युद्ध आणि फी अनुदाने.

(दोन) विस्थापित इसम.

(तीन) रियासती शिष्यवृत्त्या.

(चार) सामान्य शिष्यवृत्त्या.

(पाच) प्राथमिक शाळांना अनुदाने—

(अ) खाजगी प्राथमिक शाळांना सहाय्यक अनुदान.

(ब) प्राथमिक शिक्षणाकरिता नगरपालिकांना सहाय्यक अनुदान.

(सहा) माध्यमिक शाळांना अनुदाने—

(अ) खाजगी माध्यमिक शाळांना सहाय्यक अनुदान.

(ब) माध्यमिक शिक्षणाकरिता नगरपालिकांना सहाय्यक अनुदान.

(सात) संकीर्ण—

(अ) शाळांच्या ग्रंथालयांना अनुदाने.

(ब) खाजगी ग्रंथालयांना अनुदाने.

(क) ग्रामीण ग्रंथालयांना अनुदाने.

(ड) प्रौढ शिक्षणाकरिता खाजगी शाळांना अनुदाने.

(इ) शारीरिक शिक्षणाकरिता अनुदाने.

(फ) क्रीडांगणे इत्यादींच्या परिरक्षणासाठी अनुदाने.

(ग) विदर्भ क्षेत्रामधील जिल्हा ग्रंथालये.

(ह) मागासवर्गाच्या उन्नतीसाठी उपाययोजना.

(ई) शाळांच्या इमारतींसाठी देण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीचे समीकृत हप्ते.

(ज) विशेष शिक्षणाकरिता अनुदाने.

(ख) इतर अनुदाने.

(ल) जिल्हा परिषदांनी दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(आठ) अभिकरण (एजन्सी) योजना.

(नऊ)[1] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(१) पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांन्वये अनुसूचित जमातीं करिता सुरू केलेल्या आश्रम शाळांचा विकास.

(२) अनुसूचित जमातीसाठी असलेल्या आश्रम शाळांचा विकास आणि नवीन आश्रमशाळा उघडणे.

(३) अनुसूचित जमातींच्या आश्रम शाळांमध्ये जादा सुखसोयी.

(४) भटक्या जमातींच्या आश्रम शाळांचा विकास.

(५) भटक्या जमातींच्या आश्रम शाळांमध्ये जादा सुखसोयी.

**मागासवर्गाच्या कल्याणासाठी केंद्र पुरस्कृत कार्यक्रम**

(६) विमुक्त जातींच्या आश्रमशाळेचा विकास.

(७) विमुक्त जातींकरिता जादा आश्रमशाळा उघडणे.

(८) विमुक्त जातींच्या आश्रमशाळांमध्ये जादा सुखसोयी.

---

१. दि २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) इमारती.

(९) प्राथमिक शिक्षणाचा सर्वसाधारण विस्तार.

(१०) बेकारी दूर करण्याकरिता योजना.

(११) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक सवलती.

(१२) तपासणी कर्मचारी वर्गामध्ये वाढ.

(१३) अशासकीय माध्यमिक शाळांना परिरक्षण अनुदाने.

(१४) शासकीय माध्यमिक शाळांचा विकास.

(१५) माध्यमिक शिक्षणाकरिता स्थानिक संस्थांना अनुदाने.

(१६) राजकीय पीडितांच्या मुलांना शैक्षणिक सवलती.

(१७) आश्रम शाळांचा, अशासकीय प्राथमिक शाळेचा विकास.

(१८) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(१९) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; **किंवा**

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा यामधून दिलेल्या अनुदानातून करण्यात आलेला खर्च.

**टीप.**—पंचायत समिती ही या उपशीर्षाखालील तपशीलवार शीर्ष असेल.

**क. सार्वजनिक बांधकामे** (दळणवळणाचा समावेश करून)—

**४. इमारती व दळणवळण—**

(एक) रस्ते बांधणी—

(अ) ग्राम रस्ते.

(ब) इतर जिल्हा रस्ते.

(क) प्रमुख जिल्हा रस्ते.

(ड) उपरिनिर्दिष्ट रस्त्यांवरील पूल.

**टीप.**—राज्य मार्ग निधीमधून अर्थसहाय्य देण्यात येणारे रस्ते वेगळे दाखविण्यात यावेत.

(दोन) इमारतींची बांधणी—

(१) सामान्य प्रशासन.

(२) कृषी.

(३) नागरी बांधकामे.

(४) शिक्षण.

(५) सहकार व उद्योग.

(६) आरोग्य.

(तीन) दुरुस्ती व परिरक्षण—

(अ) रस्ते—

(एक) प्रमुख जिल्हा रस्ते.

(दोन) इतर जिल्हा रस्ते.

(तीन) ग्राम रस्ते.

(ब) इमारती—

(चार) आस्थापना—

(अ) सामान्य आस्थापना—

(एक) स्थायी.

(दोन) अस्थायी.

(ब) तांत्रिक आस्थापना—

(एक) स्थायी.

(दोन) अस्थायी.

(पाच) निलंबन—

(अ) संग्रह.

(ब) भांडारे.

(क) इतर निलंबित लेखा.

(सहा) हत्यारे आणि संयंत्र.

(सात) उद्याने व बागा.

(आठ) सरकारी तरी.

(नऊ) संकीर्ण—

(अ) रस्त्यांखेरीज दळणवळणाची इतर साधने.

(ब) रस्त्यांच्या परिसराचे परिरक्षण.

(क) लाइट रेल्वेज् आणि ट्रामवेज्.

(ड) दूरध्वनीच्या तारा.

(इ) संकीर्ण.

(फ) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानामधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(दहा) [1](पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) नागरी इमारती.

(ब) दळणवळण.

(क) चालू बांधकामे.

(ड) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च—

(एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानातून करण्यात आलेला खर्च.

(अकरा) अभिकरण योजना.

**५. पाटबंधारे—**

(एक) लहान पाटबंधाऱ्यांची बांधकामे—

(अ) लहान पाटबंधाऱ्यांच्या बांधकामांचे परिरक्षण व दुरुस्ती.

(ब) जिल्हा परिषदेने दिलेला अनुदानांतून पंचायत समितीने केलेला खर्च.

---

१. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) पाटबंधाऱ्यांचे सर्वेक्षण—

(अ) आस्थापनेचे वेतन.

(ब) भत्ते, मानधन इ.

(क) प्रवास भत्ता.

(ड) घरभाडे व इतर भत्ते.

(इ) महागाई भत्ता.

(फ) आकस्मिक खर्च.

(तीन) [1] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) सरकारी अनुदानामधून पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च—

(एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानांतून केलेला खर्च.

(ब) इतर योजनांतर्गत योजना.

(चार) अभिकरण योजना.

[२] **(पाच) निलंबन**

**ड. स्वच्छता व आरोग्य**

**६. वैद्यकीय—**

(एक) रुग्णालये.

(दोन) दवाखाने—

(अ) मागासवर्गीच्या उन्नतीसाठी केलेल्या उपाययोजना.

(ब) मुफसल दवाखाने.

(तीन) अर्थसहाय्यित वैद्यक व्यवसायी केंद्रे व ग्रामीण वैद्यकीय सहाय्य केंद्रे—

(अ) ग्रामीण वैद्यकीय सहाय्य केंद्रे.

(ब) अर्थसहायित वैद्यक व्यवसायी केंद्रांना सहायक अनुदाने.

(क) अर्थसहायित वैद्यक व्यवसायी केंद्रे उघडणे.

(चार) वैद्यकीय प्रयोजनांसाठी अनुदान—

(अ) परिचारिका नेमण्यासाठी सहाय्यक अनुदान.

(ब) दवाखान्यांना अनुदाने.

(क) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(पाच) [३] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) रुग्णालयांना व दवाखान्यांना योजनांतर्गत अनुदाने.

(ब) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

---

१. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. दि. २२-११-१९७५ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानांतून करण्यात आलेला खर्च.

(सहा) अभिकरण योजना.

**टीप.**—अंमलात आणलेली प्रत्येक योजना ही, या उपशीर्षाखालील तपशीलवार शीर्ष असेल.

७. **आयुर्वेद**—

(एक) आयुर्वेदिक व युनानी दवाखाने—

(अ) मुफसल दवाखाने.

(दोन) आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांसाठी दिलेली अनुदाने—

(अ) आयुर्वेदिक दवाखाने.

(ब) युनानी दवाखाने.

(क) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(तीन) अभिकरण योजना.

८. **सार्वजनिक आरोग्य**—

(एक) प्राथमिक आरोग्य केंद्रे—

(अ) प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना.

(दोन) फिरती स्वास्थ्य पथके.

(तीन) एकत्रित वैद्यकीय व आरोग्य पथके.

(चार) लस टोचणी—

(अ) लस टोचणी आस्थापना.

(ब) सहायक अनुदान अंशदाने (लस टोचक).

(पाच) प्रसूती व बाल कल्याण केंद्रे.

(सहा) जत्रा.

(सात) संकीर्ण—

(अ) जिल्हा आरोग्य संघटना.

(ब) इतर खर्च.

(क) याज (रोगा) विरूद्ध उपाययोजना.

(ड) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(आठ) सार्वजनिक आरोग्य प्रयोजनार्थ अनुदाने.

(नऊ) [1](पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) लसटोचणी आस्थापनेतील (कर्मचाऱ्यांची) संख्या वाढविणे.

(ब) जिल्हा आरोग्य संघटनेतील (कर्मचाऱ्यांची) संख्या वाढविणे.

(क) प्राथमिक आरोग्य केंद्रे.

(ड) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च—

(इ) (एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा,

यांमधून दिलेल्या अनुदानांतून केलेला खर्च.

---

१. दि. २२-५-१९५९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दहा) साथीच्या रोगासंबंधीचा खर्च.

(अकरा) अभिकरण योजना.

**९. आरोग्य अभियांत्रिकी—**

(एक) (अ) ग्रामीण पाणीपुरवठा, परिरक्षण व दुरुस्ती.

(ब) [1](पंचवार्षिक योजनांतर्गत योजना).

*(एक) ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

*(दोन) ग्रामपंचायतींची नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना.

(तीन) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च—

(अ) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानांतून केलेला खर्च.

*(चार) जत्रांसाठी संरक्षित पाणी पुरवठा.

*(पाच) ग्रामीण जलनिःसारण.

(सहा) जलव्यवस्था केंद्रांची जपणूक करण्यासाठी बांधकामे.

(सात) पिण्यासाठी, स्नानासाठी आणि स्वयंपाकासाठी पाणी.

(आठ) संकीर्ण—

(१) जिल्हा परिषदांनी दिलेल्या अनुदानांतून पंचायत समितीने केलेला खर्च.

(२) इतर संकीर्ण योजना.

(नऊ) अभिकरण योजना.

**इ. संकीर्ण—**

**१०. व्याज—**

(एक) राज्य सरकारकडून मिळालेल्या कर्जांवरील व्याज.

(दोन) इतर कर्जांवरील व्याज—

(अ) बँकांकडून घेतलेल्या कर्जांवरील व्याज.

(ब) बाजारात उभारलेल्या कर्जांवरील व्याज.

(क) भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज.

**११. कृषी—**

(एक) कृषि शाळा—

(अ) कृषि शाळांचे व्यवस्थापन व परिरक्षण.

(ब) कृषि शाळांना सहाय्यक अनुदाने.

---

१. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* प्रत्येक योजना उप-तपशीलवार शीर्ष म्हणून समजण्यात यावी.

(दोन) नमुनेवजा प्रक्षेत्रे—

(अ) नमुनेवजा कृषि प्रकल्प.

(तीन) कृषि प्रात्यक्षिके व प्रचार—

(अ) कृषि प्रात्यक्षिके व प्रदर्शने.

(ब) अधिक धान्य पिकवा मोहिमेसाठी सुधारलेल्या बी-बियाणांचे बीजगुणन व वाटप करणे

(क) खरीप व रब्बी पीक मोहीम.

(ड) अधिक धान्य पिकवा मोहिमेखाली नगरपालिकांच्या नगरातील केरकचऱ्याचे मिश्रण करून खत करण्याबाबतच्या योजना आणि मराठवाड्यात मिश्रखताचा विकास करण्याबाबतची योजना.

(इ) कृषि संघटनांना प्रचारासाठी सहायक अनुदाने.

(चार) संकीर्ण—

(अ) जपानी पद्धतीने भाताची सघन शेती करण्याच्या योजना.

(ब) कृषि शाळांसाठी उद्धरण जल-सिंचन प्रकल्प.

(क) भाताच्या क्षेत्रात सघन शेतीसाठी पथदर्शक योजना.

(ड) पाटबंधाऱ्याचे पाणी मिळणाऱ्या गव्हाच्या क्षेत्रात सघन शेतीसाठी पथदर्शक योजना.

(इ) ज्वारीच्या सघन शेतीची योजना.

(फ) महाराष्ट्रामध्ये अमोनियम सल्फेटचे वाटप करण्याची योजना.

(ग) बंधारे घातलेल्या क्षेत्रामध्ये कोरडवाहू शेतीची पद्धत चालू करण्याबाबत योजना.

(ह) तालुका गोदामांची स्थापना.

(ई) विदर्भामध्ये बी-बियाणांची भांडारे स्थापन करण्यासाठी योजना.

(ज) जिल्हा कृषि अधिकाऱ्याने करावयाची मृद-संधारण कार्याच्या परिरक्षणासाठी योजना.

(ख) पीक स्पर्धा.

(ल) अनुसूचित जमातींच्या शेतकऱ्यांना बक्षिसे देण्याबाबत योजना.

(म) विद्या मंदिराची जमीन.

(न) विदर्भ क्षेत्रामध्ये गव्हाच्या बुरशी प्रतिबंधक प्रकारच्या बियाणाचे बीजगुणन व वाटप करण्यासाठी योजना.

(उ) मराठवाड्यामध्ये सुधारलेल्या बियाणांचे बीजगुणन व वाटप करण्यासाठी योजना.

(प) फलोत्पादनाच्या विकासाची योजना.

(क्यू) सुरुंगाने व विंधण यंत्राने विहिरी खोदण्याची आणि कर्षित्र नांगरणीची योजना.

(र) महाराष्ट्र राज्यात धान्य पिकांच्या सुधारलेल्या बियाणाच्या प्रकारचे बीजगुणन व त्यांचे वितरण यांची योजना.

(स) इतर योजना.

(ट) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(पाच)[1] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) हरित खतांसाठी सन्न बियाणांच्या अर्थसहाय्यित वितरणाची योजना.

(ब) अनुसूचित जातींसाठी पाटबंधाऱ्याच्या विहिरी.

(क) अनुसूचित जमातींसाठी पाटबंधाऱ्याच्या विहिरी.

(ड) रोप संरक्षक उपकरणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देणे.

(इ) कृषि शाळा.

(फ) उद्यानविद्या विकास.

(ग) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च—

(ह) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानांतून केलेला खर्च.

(सहा) अभिकरण योजना.

१२. **पशुसंवर्धन**—

(एक) पशु पैदास सुधारणा—

(अ) पशुवैद्यक सहाय्य.

(ब) पशुसंवर्धन विभाग.

(क) कृत्रिम रेतन उप-केंद्रे.

(ड) रोगापासून गुरांचा बचाव करण्यासंबंधी योजना.

(इ) आधारभूत ग्राम योजना.

(फ) निवडक पाड्यांच्या पालनपोषणासाठी योजना.

(ग) देवनी गुरांची नोंदणी व दूध नोंदणी योजना.

(ह) मराठवाड्यामध्ये ८ वळू बैलांची व्यवस्था.

(ई) जिल्हा वळू केंद्र उघडण्यासाठी योजना.

(ज) अनुसूचित क्षेत्रामध्ये वळू केंद्रे चालू ठेवण्यासंबंधी योजना.

(के) अनुसूचित नसलेल्या क्षेत्रामध्ये वळू केंद्रे उघडण्यासंबंधी योजना.

(ल) (१) देवनी पट्टयात २१ वळू केंद्रे उघडणे; (२) तुळजापूर व उस्मानाबाद तालुक्यात वळू केंद्र उघडणे.

(म) पुण्याच्या कृषि महाविद्यालयाच्या विस्तार शाखेच्या विकास क्षेत्रात गायीच्या पाड्यांच्या (ठेवण्याच्या) जागा निश्चित करणे.

(न) राज्याच्या मुंबई क्षेत्रात गो-शाळांचा व पांजरपोळांचा विकास करणे.

(उ) गो-शाळा विकास योजना.

(प) विदर्भामधील गो-सदन योजना चालू ठेवणे.

(दोन) पशुवैद्यक दवाखाने—

(अ) रुग्णालये व दवाखाने.

---

१. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) गुरांच्या जत्रा—

(अ) अखिल भारतीय पशु प्रदर्शन समितीला सहाय्यक अनुदान व गरीब पशु पैदासकारांना त्यांची गुरे गुरांच्या प्रदर्शनामध्ये पाठविण्यासाठी अनुदान.

(ब) गुरांचे प्रदर्शन व मेळावे भरविणे. बक्षिसे देण्यासाठी अनुदान.

(चार) संकीर्ण—

(अ) प्रचार.

(ब) अनुसूचित क्षेत्रात कुक्कुटपैदाशीची सुधारणा करण्यासाठी योजना.

(क) पशुधन सुधारणेच्या विस्तृत कार्याची योजना.

(ड) विविध संस्थांना सहायक अनुदान देणे.

(इ) मान्यताप्राप्त कुक्कुटपालन अभ्यासक्रम उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी कुक्कुटपालन प्रक्षेत्र सुरू करण्यासाठी कर्ज देण्याची योजना.

(फ) मेष आणि लोकर विस्तार केंद्रे.

(ग) कुक्कुटपालन प्रात्यक्षिक केंद्रे.

(ह) ३९ भूतपूर्व मध्यप्रदेश कुक्कुटपालन आधारभूत ग्रामकेंद्रे आणि एक समूह आधारभूत ग्रामकेंद्र चालू ठेवण्यासंबंधीची योजना.

(ई) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(पाच) [1](पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) प्रचार.

(ब) पशुपैदास प्रक्षेत्रे आणि वळू आगारे.

(क) कुक्कुटपालन विकास योजना.

(ड) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(इ) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा. यांमधून दिलेल्या अनुदानातून केलेला खर्च.

(सहा) अभिकरण योजना—

१३. वने—

(एक) ग्रामवनांसाठी अनुदाने—

(अ) ग्रामवनांबाबत पंचायतींनी केलेली योजना.

(ब) पंचायतींच्या अभिकरणाद्वारे गटाबाहेरील क्षेत्रात वनांच्या निर्मितीसाठी योजना.

(दोन) [1](पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) वनरोपणासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य.

---

१. दि. २२-५-१९५९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

(तीन) पंचायत समिती—

(अ) शासकीय अनुदानांमधून पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(ब) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा;

यांमधून दिलेल्या अनुदानातून केलेला खर्च.

(चार) अभिकरण योजना—

१४. **समाजकल्याण—**

(एक) मागासवर्गाचे कल्याण—

(अ) मागासवर्ग कल्याण विभाग.

(ब) मागासवर्गींना शिष्यवृत्त्या (अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती वगैरे).

(क) मागासवर्गाच्या वसतिगृहांना अनुदाने.

(ड) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(दोन) अस्पृश्यता निवारण—

(तीन) [१] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(अ) मागासवर्ग कल्याण विभाग.

(ब) मागासवर्गींना शिष्यवृत्त्या (अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती वगैरे).

(क) मागासवर्गाच्या वसतिगृहांना अनुदाने.

(ड) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(तीन) [१] (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)—

(१) अनुसूचित जमातींचे कल्याण—

(एक) शिक्षण—

(एक) शिष्यवृत्त्या देणे; अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची व परीक्षेची फी देणे.

(दोन) वसतिगृहांना अनुदाने.

(तीन) सर्वजातीय वसतिगृहांना अनुदाने.

(चार) अनुसूचित जमातीच्या वसतिगृहांना इमारत अनुदाने.

(दोन) आर्थिक उन्नती—

(एक) कुटिरोद्योगांना आणि व्यवसायांना अर्थसहाय्य देणे.

(दोन) दुभती जनावरे विकत घेण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

(तीन) वसतिगृहांना अनुदाने.

---

* १. दि. २२-५-१९५९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

(तीन) आरोग्य, गृहनिर्माण व इतर योजना—

(एक) अनुसूचित जमातीच्या वसतिगृहांना इमारत अनुदाने.

(दोन) अनुसूचित क्षेत्रांमध्ये वैद्यकीय सहाय्य देण्यासाठी सेवाभावी संस्थांना अनुदाने.

(तीन) अनुसूचित क्षेत्रात अर्थसहायित आरोग्य पथके.

(चार) वैद्यकीय मदत.

(पाच) अनुसूचित जमातींच्या रुग्णांसाठी परिवहनाच्या सोयी.

(सहा) अनुसूचित क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या विहिरी बांधणे.

(सात) जनजाती क्षेत्रात दळणवळणाच्या साधनांची सुधारणा.

(आठ) अनुसूचित जमातींना घरबांधणीसाठी मदत.

(२) अनुसूचित जातींचे कल्याण—

(एक) शिक्षण—

(एक) अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, शिक्षणाची आणि परीक्षेची फी देणे.

(दोन) बालवाड्या.

(तीन) संस्कार केंद्रे.

(चार) वसतिगृहांना अनुदाने.

(पाच) सर्वजातीय वसतिगृहांना अनुदाने.

(सहा) अनुसूचित जातीच्या वसतिगृहांना इमारत अनुदाने.

(दोन) आर्थिक उन्नती—

(एक) कुटिरोद्योगांसाठी आणि व्यवसायांसाठी अर्थसहाय्य देणे.

(दोन) दुभती जनावरे विकत घेण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

(तीन) आरोग्य, गृहनिर्माण आणि इतर योजना—

(एक) पिण्याच्या पाण्याच्या विहिरी.

(दोन) वैद्यकीय मदत.

(तीन) अनुसूचित जातींना गृहनिर्माण सहाय्य.

(३) इतर मागासवर्गांचे कल्याण—

(विदर्भाच्या विनिर्दिष्ट क्षेत्रांच्या बाहेरील जमाती, नवबौद्ध व भटक्या जमाती.)

(एक) शिक्षण—

(एक) इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, शिक्षणासाठी फी व परीक्षा फी देणे.

(दोन) भटक्या जमातींसाठी बालवाड्या.

(तीन) भटक्या जमातींसाठी संस्कार केंद्रे.

(चार) वसतिगृहांना अनुदाने.

(पाच) सर्वजातीय वसतिगृहांना अनुदाने.

(सहा) वसतिगृहांना इमारत अनुदाने.

(सात) वसतिगृहे.

(दोन) इतर योजना—

(एक) कुटिरोद्योगांसाठी आणि व्यवसायांसाठी अर्थसहाय्य देणे.
(दोन) दुभती गुरे विकत घेण्यासाठी अर्थसहाय्य देणे.
(तीन) भटक्या जमातींच्या उन्नतीसाठी सेवकांची नियुक्ती.
(चार) प्रामुख्याने इतर मागासवर्गाची वस्ती असलेल्या भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या विहिरी बांधणे.

मागासवर्गाच्या कल्याणासाठी केंद्र पुरस्कृत कार्यक्रम—

(एक) अनुसूचित जमातींचे कल्याण—

(अ) आर्थिक उन्नती—

(एक) जनजाती विकास गट.

(दोन) अनुसूचित जातींचे कल्याण—

(अ) मैला वाहून नेण्यासाठी वापरावयाच्या फेरीगाड्या आणि हातगाड्या खरेदी करण्यासाठी ग्रामपंचायतींना अनुदाने.

(४) विमुक्त जातींचे कल्याण—

(एक) विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी देण्यामध्ये सूट देणे आणि शिष्यवृत्त्या देणे.
(दोन) बालवाड्या.
(तीन) संस्कार केंद्रे.
(चार) वसतिगृहांना सहाय्यक अनुदान.
(पाच) वसतिगृहांना इमारत अनुदाने.

(तीन) इतर योजना—

(एक) कुटिरोद्योग व व्यवसायांना अर्थसहाय्य देणे.
(दोन) दुभती गुरे विकत घेण्यासाठी विमुक्त जातींना अर्थसहाय्य देणे.
(तीन) विमुक्त जातींसाठी गृहनिर्माण.
(चार) विमुक्त जातींच्या उन्नतीसाठी सेवकांची नियुक्ती.
(पाच) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा
(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यांमधून दिलेल्या अनुदानातून केलेला खर्च.

(सहा) अभिकरण योजना.

१५. सहकार—

(एक) अधीक्षण—

(अ) सहकार.
(ब) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(दोन) [1] [पंचवार्षिक योजनांतर्गत योजना]—

(अ) हस्तकला कारागिरांच्या सहकारी संस्था धरून औद्योगिक सहकारी संस्थांना सहायक अनुदाने.

(ब) गोदाम छपऱ्या बांधण्यासाठी औद्योगिक सहकारी संस्थांना सहायक अनुदाने.

(क) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यामधून दिलेल्या अनुदानातून केलेला खर्च.

(तीन) अभिकरण योजना.

**१६. उद्योगधंदे—**

(एक) औद्योगिक पर्यवेक्षक.

(दोन) कुटिरोद्योग—

(अ) लघु उद्योग आणि कुटिरोद्योगांना वित्तीय सहाय्य देण्याची योजना.

(ब) मागासवर्ग कल्याण योजना.

(क) जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदानांमधून पंचायत समितीने केलेला खर्च.

(तीन) इतर उद्योग

(चार) औद्योगिक प्रयोजनांसाठी अनुदाने—

(अ) कारागिरांना व्यक्तिगत सहाय्यक अनुदाने.

(पाच) औद्योगिक शिक्षण—

(अ) प्रशिक्षण संस्था, केंद्रे आणि शाळा.

(ब) प्रशिक्षण-नि-उत्पादन केंद्रे व उत्पादन केंद्रे.

(क) प्रशिक्षण केंद्रांमधील प्रशिक्षार्थ्यांना विद्यावेतन.

(सहा) [1] [पंचवार्षिक योजनांतर्गत योजना]—

(अ) काथ्या उद्योग विकास.

(ब) पंचायत समितीने प्रत्यक्ष केलेला खर्च.

(एक) जिल्हा परिषदेने—

(१) आपली उत्पन्नाची साधने; किंवा

(२) पंचायत समितीचा, अनुदान म्हणून दिलेला उपकरातील हिस्सा.

यामधून दिलेल्या अनुदानातून केलेला खर्च.

(सात) अभिकरण योजना.

---

१. दिनांक २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

**१७. सामूहिक विकास—**

(एक) [1][पंचवार्षिक योजनांतर्गत योजना]—

अ—सामूहिक विकास प्रकल्प—

(अ) जिल्हा आस्थापना.

(ब) पशुसंवर्धन आणि कृषि विस्तार.

(क) पाटबंधारे.

(ड) पुनःप्रापण.

(इ) आरोग्य आणि ग्रामीण स्वच्छता.

(फ) शिक्षण.

(ग) समाज शिक्षण.

(ह) दळणवळण.

(आय) ग्रामीण कला, शिल्पकला आणि उद्योग.

(ज) गृहनिर्माण.

(के) निलंबन.

(ल) बहुउद्देशीय विकास प्रकल्प.

ब—स्थानिक विकासाची बांधकामे—

(अ) पाणीपुरवठा.

क—सर्वसाधारण—

(अ) प्रशिक्षण योजना.

(ब) इतर योजना.

ड—अभिकरण योजना.

**१८. संकीर्ण विभाग—**

(एक) समाज शिक्षण.

(दोन) ग्रामीण गृहनिर्माण.

(तीन) इतर संकीर्ण योजना.

(चार) अभिकरण योजना.

**१९. निवृत्तिवेतने व इतर निवृत्ती लाभ—**

(एक) (अ) निवृत्तिवेतन निधीला अंशदान.

(ब) भविष्यनिर्वाह निधीला अंशदान.

(क) प्रतिनियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांची निवृत्तिवेतने व रजा वेतने यासाठी शासनास अंशदान.

(दोन) (अ) निवृत्तिवेतन प्रदान (यामध्ये विदर्भातील जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाचा समावेश होतो).

(ब) [2][पंचवार्षिक योजनांतर्गत योजना]—

(१) प्राथमिक शिक्षकांना निवृत्तिवेतने.

---

१. दि. २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

२. दि. १६-४-१९७४ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

२०. **संकीर्ण—**

(अ) जमीन महसूल भरपाई निधीला अंशदान.
(ब) धर्मादाय प्रयोजनांसाठी देणग्या.
(क) धर्मशाळा.
(ड) वन्य पशूंचा नाश करण्याबद्दल बक्षिसे.
(इ) सार्वजनिक स्वागत समारंभ आणि मनोरंजनाचे कार्यक्रम.
(फ) सम्मेलने.
(ग) ग्रामपंचायती—

(एक) ग्रामपंचायत सचिव.
(दोन) इतर ग्राम अधिकारी.
(तीन) ग्रामपंचायतींना अनुदाने.

(ह) संकीर्ण—

(एक) अभिकरण योजना.

**दोन.** भांडवल.

अ—कर्जे.

रकमा देणे—

विभाग एक—व्याजी कर्जे—

(एक) राज्य सरकारच्या कर्जाची परतफेड.

(अ) सामूहिक विकास प्रकल्पाच्या संबंधातील कर्जे.
(ब) इतर कर्जे—

(एक) औद्योगिक प्रयोजनांसाठी कर्जे.
(दोन) शेतकऱ्यांना सहकारी योजनांसाठी कर्जे.
(तीन) मागासवर्गाच्या कल्याणासाठी कर्जे.
(चार) शैक्षणिक प्रयोजनांसाठी कर्जे.
(पाच) ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी कर्जे.
(सहा) लघु उद्योग व कुटिरोद्योग याकरिता कर्जे.
(सात) आग, पूर, वादळे इत्यादींसारख्या आपत्तींच्या निवारणार्थ कर्जे.

(क) अभिकरण योजना.

(दोन) जिल्हा परिषदांकडून कर्जे देणे.

(तीन) इतर कर्जांची परतफेड करणे—

(अ) बँकांनी दिलेल्या आगाऊ रकमाची परतफेड करणे.

(चार) जिल्हा परिषदांकडून कर्जे—

(अ) जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना कर्जे.

(ब) व्यक्तींसाठी कर्जे.

(पाच) [1] [पंचवार्षिक योजनांतर्गत योजना]—

(अ) सहकारी प्रयत्नांच्या वाढीच्या उत्तेजनार्थ कर्जे.

(ब) औद्योगिक सहकारी संस्थांसाठी कर्जे.

(क) लघु उद्योग, कुटिरोद्योग व ग्रामोद्योग यांसाठी कर्जे.

(ड) शैक्षणिक योजनांसाठी कर्जे.

(इ) गृहनिर्माण योजनांखालील सहकारी संस्थांना कर्जे.

(फ) गृहनिर्माण योजनांखाली मागासवर्गींना कर्जे.

(ग) मागासवर्गींना त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी कर्जे.

(ह) ग्रामीण गृहनिर्माण प्रकल्प योजनेखाली कर्जे.

(आय) ग्रामपंचायतींना वनरोपणासाठी कर्जे.

विभाग दोन—बिनव्याजी कर्जे—

(१) शासनाने मागील वर्षात दिलेल्या जादा आगाऊ रकमेची परतफेड.

एकूण—बिनव्याजी कर्जे.

एकूण—कर्जे व आगाऊ रकमा.

विभाग तीन—वी–ठेवी.

रकमा देणे—

(एक) कर्जनिवारण निधींच्या ठेवी.

(दोन) निवृत्तिवेतन निधी—

(अ) शिक्षकांचा निवृत्तिवेतन निधी.

(ब) जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांचा निवृत्तिवेतन निधी.

(तीन) भविष्यनिर्वाह निधी—

(अ) शिक्षकांचा भविष्यनिर्वाह निधी.

(ब) जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी.

(चार) घसारा निधी—

(अ)

(ब)

(क)

(पाच) सार्वजनिक बांधकामासाठी ठेवी—

(अ) कंत्राटदारांकडून ठेवी.

(ब) स्थानिक मंडळांकडून ठेवी.

---

१. दिनांक २२-५-१९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(सहा) प्रतिभूती ठेवी—

(अ) रोखपालांकडून प्रतिभूती ठेवी.

(ब) कंत्राटदारांकडून प्रतिभूती ठेवी.

(सात) मागणी न केलेल्या ठेवी.

(आठ) परत करावयाच्या आगाऊ रकमा—

(अ) जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या आगाऊ रकमा.

(ब) शिक्षकांना दिलेल्या आगाऊ रकमा.

(क) इतर आगाऊ रकमा.

(नऊ) स्थायी आगाऊ रकमा.

(दहा) (अ) वर्षामध्ये;

(ब) वर्षात मुदत भरलेल्या. गुंतवणुकीच्या रकमा.

(अकरा) संकीर्ण ठेवी—

(अ) ग्रामपचायतींकरिता गोळा केलेला व ग्रामपंचायतींना दिलेला जमीन महसूल उपकर

(ब) इतर ठेवी.

क. लाभकारी व्यवसाय.

ड. संकीर्ण.

एकूण—भांडवल.

एकूण—महसूल व भांडवल.

वित्त प्रेषण विभाग.

(एक) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्यामधील वित्त प्रेषण लेखा (जिल्हा परिषदेच्या वित्त विभागानेच फक्त चालवावयाचा).

(दोन) पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांच्यामधील वित्त प्रेषण लेखा. (पंचायत समितीनेच चालवावयाचा).

अखेरची शिल्लक—

एकूण बेरीज—

[1] [टीप.—पंचायत समितीमध्ये अंमलात असलेली नमुन्यामध्ये विहित केलेली शीर्षंच फक्त पंचायत समिती आपल्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करील.]

**उत्पन्न व खर्चाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे**

१३७. (१) प्रत्येक जिल्हा परिषदेने, पुढील वित्तीय वर्षासाठी परिषदेच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज, राज्य शासन या बाबतीत केलेल्या नियमाद्वारे वेळोवेळी विहित करील त्या तारखेस किंवा त्यापूर्वी व विहित नमुन्यात दरवर्षी तयार केले पाहिजेत.

---

१. १९६३ चा महाराष्ट्र ३५, कलम ५७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) प्रत्येक पंचायत समितीने, पुढील वित्तीय वर्षासाठी गट अनुदानातून हाती घेतलेली, चालू ठेवलेली व पार पाडण्यास आलेली कामे व विकास परियोजना यासंबंधीच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासन, या बाबतीत केलेल्या नियमांद्वारे वेळोवेळी विहित करील त्या तारखेस किंवा त्यापूर्वी व विहित नमुन्यात दरवर्षी तयार केले पाहिजेत.

(३) प्रत्येक पंचायत समितीने, याप्रमाणे तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर उक्त तारखे-नंतर शक्य तितक्या लवकर विचार केला पाहिजे आणि त्यात फेरबदल करून, किंवा न करता ते मान्य केले पाहिजेत आणि ते जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यासाठी राज्य शासन याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करील त्या तारखेपूर्वी जिल्हा परिषदेकडे पाठवले पाहिजेत.

(४) जिल्हा परिषदेने, पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर (पंचायत समितीने पाठविलेले अर्थसंकल्पीय अंदाज वगळून) पोट-कलम (१) मध्ये विहित केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर विचार केला पाहिजे आणि त्यात फेरबदल करून किंवा न करता [१][राज्य शासन या बाबतीत विहित करील त्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी] ते मान्य केले पाहिजेत. जिल्ह्या-तील प्रत्येक पंचायत समितीने पाठवलेले अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा भाग बनतील.

(५) वर म्हटल्याप्रमाणे विहित केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करण्यात कसूर केल्यास, पोट-कलम (१) अन्वये तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने राज्य शासनाकडे पाठवले पाहिजेत व राज्य शासनाने ते फेरबदल करून किंवा न करता मान्य केले पाहिजेत. राज्य शासनाने याप्रमाणे मान्य केलेले अर्थसंकल्पीय अंदाज प्रमाणित केले पाहिजेत आणि त्यानंतर ते जिल्हा परिषदेकडून रीतसर मान्य करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल.

(६) पंचायत समितीने, अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करण्यात आणि पोट-कलम (३) अन्वये या बाबतीत विहित केलेल्या तारखेपूर्वी जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात कसूर केल्यास, गट विकास अधिकाऱ्याने [२][पोट-कलम (२) अन्वये तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेकडे पाठवले पाहिजेत; आणि जिल्हा परिषदेने फेरबदल करून किंवा न करता ते मान्य केले पाहिजेत] जिल्हा परिषदेने [३][* * *] याप्रमाणे केलेले अर्थसंकल्पीय अंदाज प्रमाणित केले पाहिजेत आणि त्यानंतर ते पंचायत समितीने रीतसर मान्य केलेले आहेत असे समजण्यात येईल.

**टीप. ११६.**—जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याविषयी नियम :—

**आवश्यकता असेल तेव्हा सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करता येईल. पुर्नावनियोजन हे अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे मान्यतेच्या अधीन असणे.**

१३८. (१) ज्या वर्षासाठी असे कोणतेही अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करण्यात आले असतील त्या वर्षात कोणत्याही वेळी, प्रत्येक जिल्हा परिषदेस सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करता येतील. असे प्रत्येक सुधारित किंवा पुरवणी अंदाज, जणू ते मूळ अर्थसंकल्पीय अंदाज आहेत असें समजून त्याच रीतीने त्यावर जिल्हा परिषदेने विचार केला पाहिजे व ते मान्य केले पाहिजेत.

---

१. हे शब्द सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५७ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १९ (अ) द्वारे पोट-कलम (२) अनुसार जिल्हा परिषदेकडे या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशाच मान्यतेच्या अधीन अर्थसंकल्पीय अंदाजातील निधीचे वेळोवेळी पुनर्विनियोजन करता येईल.

[1](परंतु, राज्य शासनाने दिलेल्या अनुदानामधील निधीचे पुनर्विनियोजन हे विहित करण्यात येईल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीन असेल.)

**टीप ११७.**—शासकीय अनुदानातून पुनर्विनियोजन करण्याकरिता अटी व शर्ती विहित करणारे नियम.

**शासकीय अधिसूचना ग्राम विकास विभाग बीजीटी-३५६६/९७८/६६/झेडआय, दिनांक ३ नोव्हेंबर १९७१.**

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (निधींचे पुनर्विनियोजन) नियम १९७१ असे म्हणता येईल.

२. **पुनर्विनियोजनाच्या अटी व शर्ती.**—महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १३८ च्या तरतुदींच्या अधीन राहून जिल्हा परिषदेला राज्य शासनाने दिलेल्या अनुदानामधून (नियम ३ मध्ये निर्देशिलेल्या अनुदानाव्यतिरिक्त इतर अनुदाने) निधीतील बचतींचे पुढील अटीवर पुनर्विनियोजन करता येईल :—

(एक) पुनर्विनियोजन हे एकाच प्रधान शीर्षाखालील एका योजनेतून दुसऱ्या योजनेत करता येईल.

(दोन) समाजकल्याण योजनांच्या संबंधातील पुनर्विनियोजन हे त्यांना जोडलेल्या अनुसूचीच्या तरतुदीनुसार करण्यात येईल; आणि

(तीन) पुनर्विनियोजनाच्या संबंधातील सूचना राज्य शासनाच्या संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांना पाठविण्यात येतील.

३. **योजनांतर्गत अनुदाने आणि गट अनुदाने.**—योजनांतर्गत अनुदाने आणि गट अनुदाने यातून करावयाच्या निधीचे पुनर्विनियोजन हे पुढील आणखी शर्तींच्या अधीन राहून केले जाईल :—

(अ) जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती राज्य निधीमधून तत्सम पुनर्विनियोजन करण्यास जो सक्षम अशा संबंधित विभाग प्रमुखाची पूर्व सहमती घेतल्याखेरीज निधीचे पुनर्विनियोजन करणार नाही.

(ब) मूलतः जिच्यासाठी अनुदान देण्यात आले होते ती योजना आणि जिच्या फायद्यासाठी रकमेचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे ती योजना एकाच क्षेत्राखाली (विकास शीर्षाखाली) असल्या पाहिजेत आणि त्यांच्या कार्याचा विषयही एकच असला पाहिजे.

परंतु, गट अनुदानांचा सामूहिक विकास कार्यक्रमाशी जेथवर संबंध आहे तेथवरचे त्यांच्याशी संबंधित निधींचे पुनर्विनियोजन हे पंचायत समित्यांकडून, १ मे १९६२ च्या लगतपूर्वी अशा अनुदानांना जे निर्बंध व शर्ती लागू होत्या त्या निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीनतेने केले जाईल.

## अनुसूची

१. **पुनर्विनियोजनाच्या प्रयोजनार्थ**—

(एक) मागासवर्गासाठी असलेल्या समाजकल्याण योजनांची पुढील प्रवर्गात विभागणी करण्यात येईल :—

(अ) अनुसूचित जमातींसाठी योजना.

(ब) अनुसूचित जातींसाठी योजना.

---

१. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १० द्वारे हे नवीन परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(क) विमुक्त जातींसाठी योजना; आणि

(ड) इतर मागासवर्गांसाठी योजना.

(दोन) अशा योजनांची प्राथम्य क्रमानुसार खालीलप्रमाणे गटांमध्ये आणखी विभागणी केली जाईल आणि ती शासनाच्या शिक्षण व समाजकल्याण विभागाकडून दरवर्षी पुरवल्या जाणाऱ्या वार्षिक मागासवर्ग कल्याण कार्यक्रमांमध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल :—

**(अ) अनुसूचित जमातींसाठी योजना—**

(एक) शिक्षण.

(दोन) आर्थिक उन्नती.

(तीन) आरोग्य, गृहनिर्माण व इतर योजना.

**(ब) अनुसूचित जातींसाठी योजना—**

(एक) शिक्षण.

(दोन) आर्थिक उन्नती.

(तीन) आरोग्य, गृहनिर्माण आणि इतर योजना.

**(क) विमुक्त जातींसाठी योजना—**

(एक) शिक्षण.

(दोन) इतर योजना.

**(ड) इतर मागासवर्गांसाठी योजना—**

(एक) शिक्षण.

(दोन) इतर योजना.

२. कोणत्याही प्रवर्गाखाली असणाऱ्या योजनांकरिता राखून ठेवलेल्या निधींचे त्याच प्रवर्गाशी संबंधित असलेल्या योजनांखेरीज करून अन्य योजनांसाठी पुनर्विनियोजन केले जाणार नाही.

३. जिल्हा परिषदांना एकाच गटाखाली असणाऱ्या एका योजनेच्या निधीचे त्याच गटातील दुसऱ्या योजनेसाठी पुनर्विनियोजन करता येईल.

